ISSN 2347-2723 Impact Factor : 2.0260 (UIF) Volume - 4 | Issue - 2 | September - 2016

Review of Literature

# बदलते समाजजीवन आणि १९८० नंतरची ग्रामीण कादंबरी

प्रा.आशालता नारायण खोत
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, देवचंद कॉलेज,अर्जुननगर.

**प्रस्तावना:-**

अलिकडे महानगरांच्या वाढीमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.वाढत्या शहमुरांळे खेडी नष्ट होत चालली आहेत.शहरे आणि शहरी संस्कृतीची वाढ होत चालल्यामुळे कृषीसंस्कृतीवर आक्रमण झाले आहे. कृषीसंस्कृती ही एकीकडे खेड्याशी तर दुसरीकडे निसर्गाशी जोडलेली दिसून येते.परंतु वाढत्या शहरीकरणामुळे ही कृषीसंस्कृती नष्ट होत चाललेली दिसून येते.महानगरांच्या परिसरात अनेक उपनगरे अस्तित्वात आलेली दिसतात.महानगरीय संस्कृतीप्रमाणेच उपनगरांचीदेखील एक उपसंस्कृती निर्माण झाली.आपले अस्तित्व,आपले वेगळेपण जपण्यासाठी सर्वांची धडपड चाललेली दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशात लक्षणीय बदल झाले.सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात बरीच स्थित्यंतरे घडून आली.आजच्या खेड्यात शहरी संस्कृतीच्या खाणा-खुणा दिसून येतात.शहराच्या अनुकरणातून खेड्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात बदल दिसून झाले. पावसावर अवलंबून असणारी शेती फारशी फायद्याची न ठरल्यामुळे काहींना काम धंदयासाठी व नोक-या मिळविण्यासाठी गाव सोडून शहराकडे धाव घ्यावी लागली.गावगाडा संपूष्टात येऊ लागल्यामुळे गावगाड्यावर आधारित असणा-यांना गाव सोडून शहराकडे पोटासाठी जावे लागले.

१९७२ च्या दुष्काळामुळे गावंच्या गावं उद्ध्वस्त झाली.आज ती शहरामध्ये अनेक झोपडपट्यांमध्ये बकाल जीवन जगत आहेत.आज खेडी बदललेली दिसून येतात.पूर्वीच्या खेड्याप्रमाणे आजचे खेडे हे केवळ शेतीवर अवलंबून राहिलेले दिसत नाही.आज गावात पतसंस्था,दुग्धव्यवसाय,कुक्कूटपालन ह्यातूनरोजगार उपलब्ध झालेला दिसतो.गावातील




पूर्वीची पाटी-पटवा-यांची जागा आता सरपंच आणि तलाठ्यांनी घेतलेली दिसते.राजकीय सत्त्येमुळे गावात गट-तट,कलह निर्माण झालेले दिसतात.स्वातंत्र्योत्तर काळात जी स्थित्यंतरे झाली त्यांचे समग्र चित्रण मराठी साहित्यातून आले नाही.मात्र १९६० नंतरच्या मराठी साहित्याला व्यापकता प्राप्त होत गेली.आजचे ग्रामीण साहित्य वर्तमानाचा हात हातात घेऊन वाटचाल करताना दिसून येते यात शंका नाही.

**विषय विवेचन:-**

स्वातंत्र्यानंतर राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक अशा विविध क्षेत्रात बदलाचे वारे वाहू लागले.याचा परिणाम शहरांबरोबरच खेड्यांवरही झालेला दिसून येतो.ग्रामीण जीवनात सामाजिक,राजकीय धोरणांमुळे बरेच बदल झाले.शहरालगतची खेडो लक्षणीय बदललेली जाणवतात.शहरापासून दूर असणारी खेडी थोडया कमी वेगाने बदलताना दिसतात.'पेरले तर पिकत नाही आणि पिकले तर विकत नाही'अशी अवस्था आजच्या शेतक-यांची झालेली दिसून येते.त्यामुळे आजचा शेतकरी कर्जबाजारी झाला आहे.या भयभीततेमधून त्याला आत्महत्येसारखा मार्ग दिसू लागतो.

१९८०नंतरच्या काळात खाजगीकरण,उदारीकरण,जागतिकीकरण याचा उदय झाला.सगळीकडे मुक्त अर्थव्यवस्था आलेली दिसते.त्यातूनच खेडयामध्ये उदयोगांचे खाजगीकरण,कंत्राटी पद्धतीने नोकरभरती असे अनेक नवे बदल जाणवू लागले.या सर्व गोष्टींमुळे एकीकडे सुधारणा दिसत असली तरी दारिद्रय व बेकारी यामध्येही प्रचंड वाढ झाली.खेडयातील लोक रोजगारासाठी शहराकडे जावू लागले.त्यामुळे शहरावर वाढत्या लोकसंख्येचा ताण पडू लागला तर खेडी ओस पडू लागली.त्यातूनच शहराला आणि खेडयालाही अनेक समस्यांना तोंड दयावे लागले.बेरोजगारांचे प्रश्न,सहकार,कारखानदारी,सावकारी पाश,भ्रष्ट राजकारण, नागरीकरणाचा प्रभाव,उद्धवस्त होणारी एकत्र कुटुंबव्यवस्था अशा अनेक समस्या आज खेडयासमोर उभ्या असलेल्या दिसतात.

आज खेडयात मोबाईल,संगणक, टीव्ही, केबल, इंटरनेट पोहोचले.परंतू जागतिकीकरणामुळे हि जी आर्थिक सुबत्ता निर्माण होईल असे वाटत होते,ती आर्थिक सुबत्ता आली नाही.याउलट या सर्व सुखसोईंच्या

अधिन होऊन आजचा समाज आळशी व चंगळवादी बनलेला दिसतो.या सर्वांतूनच मग महागाईसारखे संकट समाजापुढे उभे राहिले.या महागाईने मात्र सर्वसामान्यांचे जगणे अवघड झालेले दिसून येते.शेतक-यांच्या जीवनावर तर याचा खूप मोठा परिणाम झालेला दिसून येतो.आज खेड्यापर्यंत उच्च शिक्षण जाऊन पोहोचले आहे.त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.पण त्या शिक्षणामुळे त्याचा शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन दुय्यम झाला.पडेल ते काम करण्याची भावना नष्ट होऊ लागली.आजच्या ग्रामीण भागातील तरूणाला पांढरपेशा राहणीमानाची ओढ लागलेली दिसून येते.नोकरी नसल्यामुळे त्याच्यासमोर बेकारीची समस्या निर्माण झालेली दिसून येते.

जागतिकीकरणाच्या या काळात ग्रामीण समाज अशा प्रकारे अस्थिर व अगतिक झालेला दिसतो.त्याचे पडसाद साहित्यावर उमटले.कारण साहित्याला समाजाचा आरसा असे म्हटले जाते.असे असले तरीही समाजाची हुबेहूब प्रतिकृती साहित्यात उमटलेली नसते.तर सामाजिक स्थित्यंतराची वर्णने साहित्यातून दिसून येतात.साहित्य आणि समाज यांचा संबंध वृक्ष आणि माती असा मानला जातो.मातीशिवाय वृक्ष ही कल्पनाच अशक्य आहे.त्याप्रमाणेच समाजाशिवाय साहित्य असू शकत नाही.त्यामुळेच सामाजिक परिवर्तन,सामाजिक स्थित्यंतरे आणि साहित्य यांचा संबंध जोडला जाऊ शकतो.

स्वातंत्र्यपूर्वकाळात ग्रामीणसमाजजीवन पारंपरिक वळणाचे होते.त्यामुळे सुरूवातीच्या ग्रामीण कादंबरीलेखनामागे दुष्काळ, शेतक-यांची दशा,महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाची प्रेरणा,गांधीवाद, साम्यवाद विचारांच्या प्रेरणा होत्या असे म्हटले जाते.१९४० ते १९६० या कालखंडातील कादंबरीत ग्रामोद्धार,स्वातंत्र्य लढा अशा काही प्रेरणा असल्याचे दिसून येते.१९६० नंतर खेडे बदलू लागले.खेड्यावर नव्या संस्कृतीने आक्रमण केलेले दिसते.खेडयातील पारंपरिक मानसिकता,बलुतेदारी मोडीत निघाली.त्याचे चित्रण व्यंकटेश माडगुळकरांच्या 'सर्व्हिस मोटार' रा.रं.बोराडेंच्या 'पाचोळा' आनंद यादव यांच्या 'गोतावळा' मधून प्रभावीपणे आलेले दिसते.

१९७५ नंतर महाराष्ट्रात राजकीय,आर्थिक,सांस्कृतिक जीवनात फार मोठी स्थित्यंतरे घडली.आहेत.१९७२ च्या दुष्काळामुळे खेडयातील लोकरहाटी आणि कृषिकेंद्रित जीवन यामध्ये मोठया प्रमाणात बदल झाला.शेतीकडे पाहण्याची पारंपरिक,स्वप्नाळू,हळवी भावना संपुष्टात आली. ग्रामीण लोकांचे यामुळे मनोधैर्य खचून गेले.याचा परिणाम सुशिक्षित, संवेदनशील वृत्तीच्या ग्रामीण तरुणाची मानसिकता हादरून गेली.आणि त्याच्यापुढे जगण्याचे आभाळाएवढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले.दुष्काळाच्या या आपत्तीचे वर्णन करणारी रा.रं.बोराडे यांची 'चारापाणी'ही कादंबरी विशेष उल्लेखणीय आहे.तसेच अरुण साधू यांच्या 'शापित' मधूनही दुष्काळात होरपळून निघालेल्या शेतकरी कुटुंबाची कहाणी मन हादरवून सोडते.

१९८० नंतर महाराष्ट्रात शेतीचे नवे प्रश्न निर्माण झाले.या प्रश्नांतूनच अनेक शेतकरी संघटना उदयास आल्या.त्यातून त्यांच्या प्रश्नांचे मग महत्त्वाचे अंग बनले.त्याचा परिणाम ऊस उत्पादक शेतकरी आणि सामाजिक जीवनातही झाला.मोहन पाटील यांच्या 'कोंडमारा'या कादंबरीत याचे वर्णन दिसून येते. तर वासुदेव मुलाटे यांच्या 'विषवृक्षाच्या मुळ्या' (१९८९)या कादंबरीत सहकारातील भ्रष्ट व्यवस्था,भ्रष्टाचार,शेतक-यांची लुबाडणूक इ.गोष्टींचे वर्णन अतिशय प्रभावी दिसून येते.राजन गवस यांच्या 'कळप'(१९९७) मधून शहरीकरणाच्या सर्व वृत्ती-प्रवृत्ती खेडयापर्यंत पोहोचल्या आहेत याचे चित्रण दिसून येते.तर 'तणकट'(१९९८)मधूनपरंपरा व आधुनिकता यांच्या समन्वयातील अभाव आणि आवश्यकता दिसून येते.

कृष्णात खोत यांच्या 'रौंदाळ'(२००७)या कादंबरीत खेडयापर्यंत पोहोचलेले राजकारण आणि खेडयातील सर्वसामान्य माणूसही त्या राजकारणात कसा ओढला जातो याचे वर्णन आले आहे.बाबाराव मुसळेंच्या 'हाल्या हाल्या दुधू दे'(१९८५)मधून सामान्य शेतक-यांची अगतिकता मांडली आहे.तर 'झाडाझडती'(१९९१)मधून विश्वास पाटील यांनी धरणग्रस्तांच्या जगण्याचीपरवड चित्रित केली आहे.'करुणाष्टक' (१९८०)मधून व्यंकटेश माडगूळकर सध्याचा लोकसंख्येचा वाढीचा प्रश्न आणि ग्रामीण मध्यमवर्गीय लोकांची होणारी फरफट मांडताना दिसतात. सदानंद देशमुख यांच्या 'तहान'(१९९८)या कादंबरीतून ग्रामीण भागातील अतिशय मोठा प्रश्न-पाणीटंचाई व त्यामुळे ग्रामीण लोकांचे होणारे हाल चित्रित करतात.रवींद्र शोभणे यांच्या 'पांढर'(२००९)मधून देखिल दुष्काळग्रस्त खेडयाची भीषण अवस्था दिसून येते.

खेडयापर्यंत उच्च शिक्षण जाऊन पोहोचले.त्या शिक्षणातून वकील,डॉक्टर,इंजिनिअर,प्राध्यापक इ.मंडळी खेडोपाडी तयार होऊ लागली.पण बेकारीमुळे आजचा ग्रामीण तरुण परिस्थितीचा गुलाम बनला आहे.बा.ग.केसकरांच्या 'वायटूळ' मध्ये घर,कुटुंब की शिक्षण अशा विचित्र मानसिकतेत अडकलेल्याग्रामीण युवकांची शोकात्मिका दिसून येते.तर पुरुषोत्तम बोरकर यांच्या 'मेड इन इंडिया'(१९८७) मध्ये गांधींच्या ग्रामराज्याचे स्वप्न कसे धुळीला मिळाले आहे त्याचे वर्णन दिसून येते.अशा काही कादंब-यांमधून बदलत्या खेडयाच्या मानसिकतेचे चित्रण दिसून येते.वाचन-लेखन-श्रवण संस्कृती खेड्यातूनही दूरदर्शनने पळवून लावली आहे.पारंपरिक आणि आधुनिक असा कुटुंबाकुटुंबातही संघर्ष सुरु झालेला दिसतो.त्याचेही चित्रण ग्रामीण कादंबरीतून होताना दिसते. शेतक-यांची,कष्टक-यांची दु:स्थिती हे विषय आता कादंब-यांमधून येऊ लागले आहेत.

१९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीत सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक,शैक्षणिक,सांस्कृतिक दर्शन होताना दिसते.१९८० नंतर ही परिस्थिती झपाटयाने बदलत गेली.बदलत्या ग्रामीण व्यवस्थेचे दर्शन १९८० नंतरच्या लेखकांनी आपल्या ग्रामीण कादंबरीतून घडविले आहे. ग्रामीण कादंबरीकारांनी देव-धर्म,नवस-सायास,जातीयता,गटबाजी,सहकार, शेतजमींचे प्रश्न,बेकारी,राजकारण असे अनेक प्रश्न आपल्या कादंब-यांतून हाताळले.त्यामुळे समाजातील निरनिराळे प्रश्न,समस्या यांची गुंतागुंत समजावून घेत एका वेगळ्या टप्प्याच्या अस्तित्वाची जाणीव आजच्या ग्रामीण कादंबरीतून होताना दिसते.गावातील उपेक्षित,दुर्लक्षित घटकांचेही चित्रण १९८० नंतरची ग्रामीण कादंबरी करताना दिसते.शहर आणि खेडे यामधील बदलत्या घडामोडीतून माणसांची जीवन शैली कशी बदलत आहे याचे वर्णन ग्रामीण कादंबरीतून होऊ लागले.आधुनिक काळातील तीव्र जीवनसंघर्ष,मानवी जीवनाला आलेला

वेग,व्यक्ती आणि समाज यांच्यातील उत्तरोत्तर गुंतागुंतीचे होत जाणारे संबंध,शेती व्यवसायातील यांत्रिकीकरण, वाढती विभक्तकुटुंबपद्धती,विज्ञान-तंत्रज्ञानामुळे बदलत जाणारी जीवनपद्धती ह्या सर्व घटना १९८० नंतरच्या कादंबरीत मोठ्या प्रमाणात चित्रित होऊ लागल्या.शहरीकरणामुळे खेड्यांचे होणारे शोषण आणि त्याचे सामाजिक व सांस्कृतिक परिणाम या ग्रामीण कादंबरीतून दिसून येऊ लागले. यामध्ये आनंद यादव,व्यंकटेश माडगुळकर,राजन गवस,मोहन पाटील, बाबाराव मुसळे,सदानंद देशमुख,कृष्णात खोत,वासुदेव मुलाटे इ.अनेक लेखकांनी आपल्या कादंब-यांतून समाजातील सामाजिक,सांस्कृतिक बदल अत्यंत परिणामकारकपणे चित्रित केले आहेत.

वास्तवाचा वेध घेणे हे १९८० नंतरच्या कादंबरीचे नवे सूत्र असलेले दिसून येते.त्यामुळे ह्या ग्रामीण कादंबरीतून सामाजिकतेचे भान दिसून येते.१९८० नंतरच्या कादंबरीत नवे आशय-विषय व परिवर्तनाचा नवाआविष्कार दिसून येतो.बदललेल्या सामाजिक स्थिती-गतीच्या अनुषंगाने मानवी जीवनात जी स्थित्यंतरे घडत गेली त्याचा नेमका वेध आजच्या ग्रामीण कादंबरीने घेतला आहे,असे म्हणावेसे वाटते.बदलती मूल्ये आणि त्याने बदलत जाणारी ग्रामीण माणसाची मानसिकता याचेही वर्णन ग्रामीण कादंबरी करू लागली आहे.शेती-शेतकरी,गाव-गावगाडा यामध्ये १९८० नंतर झालेले बदल,व्यापारीकरण, तरुणांची बदलती मानसिकता,बागाईतदारांची मिजास या बदलत्या ग्रामीण वास्तवाचे चित्रण नागनाथ कोत्तापल्ले,मोहन पाटील,राजन गवस यांच्या कादंब-यांतून आढळून येते.

**निष्कर्ष : -**

१. स्वातंत्र्यानंतर राजकीययाचा परिण.आर्थिक अशा विविध क्षेत्रात बदलाचे वारे वाहू लागले,शैक्षणिक,सामाजिक,ाम शहरांबरोबरच खेड्यांवरही झालेला दिसून येतो.

२. १९८०नंतरच्या काळात खाजगीकरणत्यातूनच शहराला आणि खेडयालाही .जागतिकीकरण याचा परिणाम खेड्यांवर झालेला दिसतो,उदारीकरण, .अनेक समस्यांना तोंड दयावे लागले

३. १९४० ते १९६० या कालखंडातील कादंबरीत ग्रामोद्धार स्वातंत्र्य लढा,अशा काही प्रेरणा असल्याचे दिसून येते.

४. १९८० नंतर महाराष्ट्रात शेतीचे नवे प्रश्न निर्माण झाले त्याचे चित्रण साहित्यातून होऊ लागले.

५. बदलत्या ग्रामीण व्यवस्थेचे दर्शन १९८० नंतरच्या लेखकांनी आपल्या ग्रामीण कादंबरीतून घडविले आहे .

६. १९८० नंतरच्या कादंबरीत नवे आशयव-िषय व परिवर्तनाचा नवाआविष्कार दिसून येतो.

७. आनंद यादवअनेक लेखकांनी .वासुदेव मुलाटे इ,कृष्णात खोत,सदानंद देशमुख,बाबाराव मुसळे ,मोहन पाटील,राजन गवस,व्यंकटेश माडगुळकर, .सांस्कृतिक बदल अत्यंत परिणामकारकपणे चित्रित केले आहेत,यांतून समाजातील सामाजिक-आपल्या कादंब

**संदर्भ ग्रंथ-**

१)सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य - संपा.डॉ.र.बा.मंचरकर पद्मगंधा प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती,२३/१०/२०११.

२)ग्रामीण साहित्य आणि संस्कृती - मोहन पाटील स्वरूप प्रकाशन,द्वितीय आवृत्ती,१५/०८/२००८.

३)आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता -संपा.डॉ.मृणालिनी शहा,डॉ.विदयागौरी टिळक पद्मगंधा प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती,२७/०३/२००७ .